# Vasantdada Patil Pratishthan's Law College

APPROVED BY BCI NEW DELHI, GOVT. OF MAHARASHTRA, UNIVERSITY OF MUMBAI
TRUST REGD. NO. F.6738 (MUMBAI)

VPPLC/OFFICE/2021-22/ 1416

02.02.2022

**NOTICE**

All the students are hereby informed to note the following SOP's to be followed as per the Government of Maharashtra Vide GR. No. संकीर्ण२०२१/प्र.क्र.६/विशि-३, दिनांक २५/०१/२०२२ and University of Mumbai Circular No. Aff/ICC/2021-22/41 dated 29.01.2022 regarding reopening the colleges from 1st February, 2022.

Further the students are informed to submit their google form information immediately on following link;-

https://forms.gle/kfVSXhXDZFaqKTYF9

The guidelines from Government of Maharashtra and University of Mumbai are as follows;

1. Thermal screening is mandatory before entry in the campus
2. Sanitization / hand wash / social distancing / wearing mask is mandatory for all students in the college.
3. 2 Vaccination jobs/shots are mandatory for all students.
4. Certificate of vaccination is mandatory, keep the soft copy of the certificate of vaccination is handy with you, preferably on your mobile.

Vasantdada Patil Pratishthan's Law College MUMBAI 400022.

5. Time table/ Duration can be as per offline but standards should be 100% only.
6. Arogya Setu app should be downloaded and available in the mobile.
7. Students having cough, cold and fever and other symptoms of Covid19 shall not report to the college.
8. College timing is 07:30 am to 12:30 pm which may be as per Elective Subject.
9. All other SOP's and guidelines issued by the University of Mumbai and Government of Maharashtra time to time.

Vasantdada Patil Pratishthan's Law College MUMBAI 400022.

(Dr. Dinkar D. Pawar)
I/c Principal

Principal
Vasantdada Patil Pratishthan's Law College
Vasantdada Patil Educational Complex,
Eastern Express Highway,
Padmabhushan Vasantdada Patil Marg,
Sion, Mumbai - 400 022.

Enclosed: 1) Government of Maharashtra Vide GR. No. संकीर्ण२०२१/प्र.क. ६/विशि-३, दिनांक २५/०१/२०२२

2. University of Mumbai Circular No. Aff/ICC/2021-22/41 dated 29.01.2022

Copy to:-

4. Trustee Office
5. Notice Board
6. College Website

Bellingam : Vivekhan new shelas/Circular (Pra)

# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2021-22)/41 / of 2022**

**परिपत्रक:**

**विषय:— मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांमधील नियमित वर्ग प्रत्यक्षरित्या सुरू करण्याबाबत.**

संदर्भ:— उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णय क्र. संकीर्ण २०२१/प्र.क्र. ६/ विशि—३ दिनांक २५ जानेवारी, २०२२

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शासन परिपत्रक दिनांक ०७ जानेवारी, २०२२ अधिक्रमित करण्यात येत असून उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

१) मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांमधील नियमित वर्ग दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ पासून प्रत्यक्षरित्या ऑफलाईन पध्दतीने सुरू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि महाविद्यालय ज्या आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका किंवा जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी कोव्हिड—१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबाधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेउन महाविद्यालय सुरू करण्याबाबत सदर प्राधिकरणांशी विचारविनियम करून योग्य तो निर्णय संबंधित महाविद्यालयाने त्यांच्या स्तरावर घ्यावा. संबंधित प्राधिकरणांना महविद्यालयांना मार्गदर्शन करण्यासाठी विनंती पत्रे विद्यापीठाकडून पाठविण्यात आलेली आहे.

२) महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा—यांची उपस्थिती १००% असावी.

३) ज्यांनी कोव्हिड— १९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत, अशा विद्यार्थी/ विद्यार्थीनींना महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची परवानगी राहील. तथापी लसीकरण (दोन्ही डोस) न झालेल्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करून देण्यात यावी.

४) महाविद्यलयांच्या दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ पर्यत घेण्यात येणा—या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात. विजेची अनुपलब्धता किंवा नेटवर्क कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे किंवा विद्यार्थी अथवा त्याचे कुटुंबीय कोराना बाधित असल्यास किंवा आरोग्यविषयक इतर समस्यांमुळे विद्यार्थी परीक्षा देउ शकला नाही तर अशा विद्यार्थ्यांची ऑनलाईन/ ऑफलाईन पध्दतीने पुनर्परीक्षा घेण्यात यावी.

५) परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणा—या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी महाविद्यालयांनी हेल्पलाईनची व्यवस्था करावी. परीक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने महाविद्यालयांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम/ नमुना, प्रश्नसंच, हेल्पलाईन नंबर, इत्यादी स्वयंस्पष्ट माहिती उपलब्ध करून द्यावी.

६) ज्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींना कोव्हिड— १९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरिता संबधित महाविद्यालयांच्या प्राचार्या यांच्या मदतीने स्थानित जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून लसीकरण प्राधान्याने पूर्ण करून घ्यावे. तसेच महाविद्यालयांतील शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचा—यांचे देखील लसीकरण प्राध्यांन्याने करून घ्यावे.

७) वसतीगृहे टप्प्या—टप्प्याने सुरू करण्याबाबत संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून मार्गदर्शन घ्याव्येत.

८) महाविद्यालयांनी कोव्हिड— १९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कार्माच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने महाविद्यालय सुरू करण्याबाबत दिलेले मार्गदर्शक सुचना (UGC Guidelines for Re-Opening of Colleges) लागू राहतील.

उपरोक्त बाबतीत मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांकडून/ संस्थांकडून काटेकोरपणे पालन करण्यात यावे व वरील दिलेल्या सुचनांचे पालन करावे

मुंबई—४०० ०३२
२९ जानेवारी, २०२२

(सुधिर पुराणिक)
कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, बिनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी, पदविका महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, समूह विद्यापीठे, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील नियमित वर्ग प्रत्यक्षरित्या सुरु करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण २०२१/प्र.क्र.६/विशि-३**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक: २५ जानेवारी, २०२२

**वाचा:-** उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे समक्रमांकाचे दि.७ जानेवारी, २०२२ रोजीचे शासन परिपत्रक.

**प्रस्तावना:-**

राज्यात वेगाने वाढत असलेल्या कोव्हिड-१९ व ओमायक्रॉनच्या रुग्णांची संख्या पाहता समूह संसर्गाचा धोका टाळण्यासाठी व रोगाचा फैलाव रोखण्यासाठी राज्यातील अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांमध्ये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील वर्ग ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत दि.७ जानेवारी, २०२२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव राज्याच्या सर्व भागात सारख्या प्रमाणात नसल्याने व राज्यातील ज्या ठिकाणी कोरोनाचा प्रादुर्भाव कमी आहे अश्या भागातील सर्व विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत स्थानिक स्तरावरुन मागणी होत आहे. त्यामुळे, राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये कोव्हिड प्रतिबंधात्मक सर्वसाधारण उपाययोजना करुन विद्यार्थ्यांकरिता ऑफलाईन पध्दतीने नियमित वर्ग सुरु करणे विद्यार्थ्यांच्या हिताचे राहील. सबब, राज्यातील सर्व विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील नियमित वर्ग सुरु करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

शासन परिपत्रक, दि. ७ जानेवारी, २०२२ अधिक्रमित करण्यात येत असून उपरोक्त पार्श्वभूमीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत:-

(१) राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालये, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे, समूह विद्यापीठे, तंत्रनिकेतने व तत्सम शैक्षणिक संस्थांमधील नियमित वर्ग दिनांक १ फेब्रुवारी, २०२२ पासून प्रत्यक्षरित्या ऑफलाईन पध्दतीने सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये ही ज्या आयुक्त, महानगरपालिका/ नगरपालिका किंवा

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे अंतर्गत येतात, त्यांच्याशी कोव्हिड-१९ च्या आजाराचा स्थानिक पातळीवरील प्रादुर्भाव व स्थानिक परिस्थिती, प्रतिबंधित प्रक्षेत्रांचे नियोजन व आरोग्यविषयक पायाभूत सुविधांची उपलब्धता या बाबी विचारात घेऊन, विद्यापीठे व महाविद्यालये सुरु करण्याबाबत सदर प्राधिकरणांशी विचारविनिमय करुन योग्य तो निर्णय संबंधित विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर घ्यावा व त्यानुसार महाविद्यालयांना ऑफलाईन पध्दतीने सुरु करण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना/ मानक कार्य प्रणाली (एसओपी) देण्यात यावी.

(२) ज्यांनी कोव्हिड-१९ च्या लसीचे दोन्ही डोस घेतलेले आहेत, अशा विद्यार्थी/ विद्यार्थीनींना विद्यापीठ व महाविद्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची परवानगी राहील. तथापि, लसीकरण (दोन्ही डोस) न झालेल्या विद्यार्थी/विद्यार्थीनींना प्रत्यक्ष महाविद्यालयात उपस्थित राहता येणार नाही, त्यांना ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात यावी.

(३) विद्यापीठे/महाविद्यालयांच्या दि.१५ फेब्रुवारी, २०२२ पर्यंत घेण्यात येणाऱ्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात. तद्नंतर, घेण्यात येणाऱ्या परीक्षा ऑफलाईन/ ऑनलाईन पध्दतीने घेण्याबाबत विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा. विजेची अनुपलब्धता किंवा नेटवर्क कनेक्टिव्हिटी नसल्यामुळे किंवा विद्यार्थी अथवा त्याचे कुटुंबीय कोरोना बाधित असल्यास किंवा आरोग्यविषयक इतर समस्यांमुळे विद्यार्थी परीक्षा देऊ शकला नाही तर अशा विद्यार्थ्यांची ऑनलाईन/ऑफलाईन पध्दतीने पुनर्परीक्षा घेण्यात यावी. परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या विद्यापीठांशी संलग्नित काही भागात नेटवर्क सेवा विस्कळीत असल्यास किंवा उपलब्ध नसल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी घेऊन ऑफलाईन स्वरुपात या भागातील विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात याव्यात.

(४) परीक्षेच्या काळात विद्यार्थ्यांना येणाऱ्या संभाव्य अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यापीठे/महाविद्यालयांनी हेल्पलाईनची व्यवस्था करावी. परीक्षा व्यवस्थितरित्या पार पाडण्याच्या दृष्टीने विद्यापीठांनी त्यांच्या संकेतस्थळावर परीक्षांचा अभ्यासक्रम, नमुना प्रश्नसंच, हेल्पलाईन नंबर, इत्यादी स्वयंस्पष्ट माहिती उपलब्ध करुन दयावी.

(५) विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीबाबत विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर निर्णय घ्यावा.

(६) वसतीगृहे टप्प्या-टप्प्याने सुरु करण्याबाबत संबंधित विद्यापीठ, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी

आढावा घेऊन व स्थानिक प्राधिकरणांशी विचारविनिमय करुन त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा व त्याप्रमाणे संबंधितांना उचित सूचना द्याव्यात.

(७) ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींनी कोव्हिड-१९ ची लस घेतलेली नाही, त्यांच्याकरिता विद्यापीठाने संबंधित संस्थांचे प्रमुख/ महाविद्यालयांचे प्राचार्य यांचे मदतीने स्थानिक जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधून लसीकरणासाठी विशेष मोहिम राबवून लसीकरण प्राधान्याने पूर्ण करुन घ्यावे. तसेच विद्यापीठ/महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे देखील लसीकरण प्राधान्याने करुन घ्यावे.

(८) राज्यातील सुरु होणाऱ्या सर्व विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्नित महाविद्यालयांनी कोव्हिड-१९ च्या व्यवस्थापनाबाबतचे राष्ट्रीय निदेश, कामांच्या ठिकाणांबाबतचे अतिरिक्त निदेश, राज्य शासनाने वेळोवेळी काढलेली मार्गदर्शक तत्त्वे किंवा मानक कार्य प्रणाली (एसओपी) तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना लागू राहतील.

२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२२०१२५१७२७१४४६०८ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

AJIT MADHUKARRAO BAWISKAR

Digitally signed by AJIT MADHUKARRAO BAWISKAR
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=HIGHER AND TECHNICAL DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, [illegible]
cn=AJIT MADHUKARRAO BAWISKAR
Date: 2022.01.25 17:42.2[illegible] +05'30

(अजित म. बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई
८. प्रधान सचिव, आपत्ती व्यवस्थापन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

१०.राज्य प्रकल्प संचालक, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान, महाराष्ट्र राज्य, मुंबई
११. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
१२. कुलगुरु, सर्व अभिमत विद्यापीठे
१३. कुलगुरु, सर्व स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे
१४. कुलगुरु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड
१५. कुलगुरु, कवि कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, नागपूर
१६. कुलगुरु, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
१७. सर्व महानगरपालिका आयुक्त
१८. सर्व जिल्हाधिकारी
१९.संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, पुणे
२०.संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
२१.संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र, मुंबई
२२.निवडनस्ती (विशि-३).